सद्ररक्षाय खलनिग्रहणाय

**जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर**

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

भ्रमरध्वणी क्र.9819208279


**प्रेसनोट** दि.०१/१०/२०२४

**‘‘मा.पंतप्रधान, भारत सरकार यांच्या ठाणे येथील दौऱ्याबाबत’’**

दिनांक ०५.१०.२०२४ रोजी ठाणे पोलीस आयुक्तालयातील कासारवडवली पोलीस ठाणेचे हद्दीत वालावलकर मैदान, हावरे सिटी, बोरीवडे गाव, घोडबंदर रोड, ठाणे या ठिकाणी मा. पंतप्रधान, भारत सरकार श्री. नरेंद्र मोदी यांचा दौरा कार्यक्रम व सभा असा पुर्व नियोजित कार्यक्रम होणार आहे. पंतप्रधान, भारत सरकार यांना असणारे संभाव्य धोके लक्षात घेवुन त्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने सर्वतोपरी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

मा.पंतप्रधान, भारत सरकार श्री.नरेंद्र मोदी यांच्या सदर दौऱ्याच्या अनुषंगाने ०४ अपर पोलीस आयुक्त, ०९ पोलीस उप आयुक्त, १६ सहाय्यक पोलीस आयुक्त, ६३ पोलीस निरीक्षक, १७८ सपोनि/पोउपनि, ११७० पुरुष पोलीस अंमलदार तसेच ३३६ महिला पोलीस अंमलदार, क्युआरटी पथक असे मनुष्यबळ वापरण्यात येणार असुन, त्यात साध्या वेशातील पुरुष व महिला अधिकारी अंमलदारांचा समावेश करण्यात येणार आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर